सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १२५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २६ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## राम मंदिर देणगी चोरी- ट्रस्ट महासचिव चंपत राय यांचा राजीनामा

### ट्रस्टी अनिल मिश्रांचीही सोडचिट्ठी; टिन्नूसह ८ जणांना बेड्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अयोध्या-** अयोध्या राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरणी मंदिर ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांनी अखेर आपला राजीनामा दिला आहे. त्यांनी ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास यांच्याकडे आपला राजीनामा सादर केला. विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा यांनीही राजीनामा दिला आहे.विश्वस्त नृपेंद्र मिश्रा यांनी 'दैनिक दिव्य मराठी'ला सांगितले की, मला चंपत राय आणि अनिल मिश्रा यांच्या राजीनाम्याबाबत माहिती मिळाली आहे.तत्पूर्वी, गुरुवारी रात्री उशिरा चंपत राय यांचे निकटवर्तीय रामशंकर यादव (उर्फ 'टिन्नू') यांच्यासह आठ आरोपींना अटक करण्यात आली होती. पोलीस आज सर्व आरोपींना न्यायालयात हजर करून त्यांची १४ दिवसांची कोठडी मागणार आहेत.

ट्रस्टचे सदस्य कृष्ण मोहन यांच्या तक्रारीवरून गुरुवारी सायंकाळी उशिरा याप्रकरणी पहिली एफआयआर (ऋखठ) दाखल करण्यात आली. मात्र, या एफआयआरमध्ये चंपत राय आणि डॉ. अनिल मिश्रा यांच्यासारख्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची नावे नाहीत. ही चोरीची घटना सर्वप्रथम ७ जून रोजी उघडकीस आली होती.




उत्तर प्रदेश सरकारने १३ जून रोजी या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथक (डखढ) स्थापन केले आणि एसआयटीने २३ जून रोजी अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) संजय प्रसाद यांना आपला प्राथमिक अहवाल सादर केला.

दरम्यान, दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी शुक्रवारी राम लल्लाचे दर्शन घेतले. ते म्हणाले - ज्यांनी हे महापाप केले, त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. एफआयआर (ऋखठ) केवळ एक दिखावा आहे. या प्रकरणी प्रभावशाली व्यक्तींना वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## लोहगड हत्या प्रकरण:खटला जलदगती न्यायालयात चालणार

### ॲड. उज्ज्वल निकमांची एंट्री; सिया केतनच्या अडचणीत वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ मुंबई-** राज्यभरात



खळबळ उडवून देणाऱ्या पुण्याच्या लोहगड हत्या प्रकरणाने पुरुषांवरील अत्याचाराची एक अतिशय गंभीर बाजू समाजासमोर आणली आहे. स्वतःच्याच होणाऱ्या नवऱ्याला (केतन अग्रवाल) आपल्या प्रियकराच्या मदतीने कट रचून निर्दयीपणे संपवल्याचा धक्कादायक प्रकार यात उघडकीस आला आहे.

### न्याय देण्यासाठी कोणतीही कसूर सोडणार नाही- मुख्यमंत्री

लोहगड येथे घडलेल्या केतन अग्रवाल यांच्या दुर्दैवी हत्या प्रकरणी, त्यांचे वडील विशाल अग्रवाल यांनी आज पुण्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत आपल्या मुलाला न्याय मिळवून देण्याची मागणी केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी अग्रवाल कुटुंबीयांचे सांत्वन करत, त्यांना न्याय देण्यासाठी सरकारकडून कोणतीही कसूर सोडली जाणार नाही आणि या प्रकरणातील दोषींना अत्यंत कठोर शिक्षा व्हावी यासाठी आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत, असे भक्कम आश्वासन दिले.

या भीषण गुन्ह्याप्रकरणी पुणे पोलिसांनी मुख्य आरोपी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन या दोघांनाही बेड्या ठोकल्या असून, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला आहे.

या प्रकरणाची पुणे पोलिसांकडून अत्यंत कसून चौकशी सुरू असून, दररोज नवनवीन आणि धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी आता आपला मोर्चा सियाच्या कुटुंबाकडे वळवला असून, सियाच्या भावालाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. तर दुसरीकडे, आपला मुलगा गमावलेल्या केतन अग्रवालच्या कुटुंबीयांनी न्यायाच्या आशेने थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेत त्यांना साकडे घातले आहे.

अग्रवाल कुटुंबीयांनी या खटल्यासाठी जलदगती न्यायालयाची स्थापना आणि विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची केलेली मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ मान्य केली आहे. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी विधी व न्याय विभागाच्या सचिवांना तातडीने आवश्यक ते निर्देश दिले असून, स्वतः ॲड. उज्ज्वल निकम यांनीही या न्यायदानाच्या प्रक्रियेत विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहण्यास आपली संमती दर्शवली आहे.

## केतन अग्रवालची हत्या अनाकलनीय

### मुख्यमंत्र्यांचा सुशिक्षित तरुणांच्या मानसिकतेवर सवाल,



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६मुंबई -** लोहगड किल्ल्यावरून ढकलून करण्यात आलेली केतन अग्रवालची हत्या खरोखरच अनाकलनीय आणि धक्कादायक आहे. समाज म्हणून आपण याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. चांगल्या घरच्या आणि सुशिक्षित मुलांमध्ये अशी सूडबुद्धी आणि गुन्हेगारी प्रवृत्ती का निर्माण होते, याचा केवळ कायदेशीरच नाही तर सामाजिक अँगलनेही तपास झाला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.पुण्याच्या लोहगड किल्ल्यावर केतन अग्रवालची त्याची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा बॉयफ्रेंड चेतन चौधरी यांनी मिळून निर्घृण हत्या केली होती. पुण्यातील प्रख्यात बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांचा मुलगा केतनचा त्याची भावी पत्नी सिया गोयलने प्रियकर चेतन चौधरीच्या मदतीने लोहगड किल्ल्यावरून ४०० फूट खोल दरीत ढकलून खून केल्याचे पोलिस तपासात दिसून आले. या दोघांना न्यायालयाने २९ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.अटकेनंतर सियाचा प्रियकर चेतनने रडत रडत स्वत:चे वडील बाबूलाल चौधरी यांना सांगितले की, घटना घडली तेव्हा सिया केतनजवळ उभी होती, मी तर दूर उभा होतो. पोलिसांच्या तपासात असे निष्पन्न झाले की, जानेवारी ते जून २०२६ या सहा महिन्यात सिया व चेतनमध्ये २००४ कॉल झाले होते.

## उद्धव ठाकरे, फडणवीस मुंबई - नागपूर एकाच विमानाने प्रवास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ मुंबई-** शिवसेना ठाकरे गटाला नुकताच मोठा धक्का बसला आहे. पक्षातील ९ खासदारांपैकी तब्बल ६ खासदारांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडली आहे. या सर्व खासदारांनी मुंबईमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. दरम्यान यावरून राज्यात राजकारण चांगलंच तापलं आहे. शिवसेना ठाकरे गट आणि उद्धव ठाकरे यांच्याकडून शिवसेना शिंदे गटावर जोरदार हल्लाबोल केला जात आहे, मात्र त्याचवेळी भाजपावर ठाकरे गटाकडून टीका करणं टाळलं जात असल्याचं देखील दिसून येत आहे. याचदरम्यान आता एक मोठी बातमी समोर आली आहे, ती म्हणजे शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकाच विमानाने प्रवास केल्याचं पहायला मिळत आहे. मुंबईहून नागपूरला रवाना होणाऱ्या विमानात उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांनी एकाच विमानातून प्रवास केला आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी हस्तादोंलन देखील केलं आहे.



इंडिगोच्या विमानातून दोन्ही नेत्यांनी एकत्र प्रवास केला आहे. यावेळी भेट झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंशी हस्तादोंलन केलं, तसेच दोन्ही नेत्यांनी एकमेकांची विचारपूस देखील केली आहे. यावेळी उद्धव ठाकरेंसोबत आदित्य ठाकरे, संजय राऊत आणि शिवसेना ठाकरे गटाचे इतर नेते देखील उपस्थित होते. दरम्यान आम्ही तिघं भेटलो हीच मोठी बातमी आहे, अशी प्रतिक्रिया देखील यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी या विमान प्रवासावर दिली आहे.

इंडिगोच्या विमानातून दोन्ही नेत्यांनी एकत्र प्रवास केला आहे. यावेळी भेट झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंशी हस्तादोंलन केलं, तसेच दोन्ही नेत्यांनी एकमेकांची विचारपूस देखील केली आहे. यावेळी उद्धव ठाकरेंसोबत आदित्य ठाकरे, संजय राऊत आणि शिवसेना ठाकरे गटाचे इतर नेते देखील उपस्थित होते. दरम्यान आम्ही तिघं भेटलो हीच मोठी बातमी आहे, अशी प्रतिक्रिया देखील यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी या विमान प्रवासावर दिली आहे.

## 'ऑपरेशन टायगर'मुळे शिंदेंची ताकद वाढली

### श्रीकांत शिंदेंना कॅबिनेट, तर राष्ट्रवादीलाही मंत्रिपदाची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६मुंबई-** 'ऑपरेशन टायगर' यशस्वी करत उद्धव ठाकरे गटाच्या ६ खासदारांना आपल्या गोटात खेचणाऱ्या



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची दिल्ली दरबारात ताकद चांगलीच वाढली आहे. लोकसभेतील वाढलेले संख्याबळ लक्षात घेता येत्या २८ किंवा २९ जून रोजी होणाऱ्या संभाव्य केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात शिवसेनेला अतिरिक्त मंत्रिपदे मिळण्याची दाट शक्यता आहे.

यात खासदार श्रीकांत शिंदे यांचे नाव कॅबिनेट मंत्रिपदासाठी आघाडीवर असून, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसलाही या फेरबदलात कॅबिनेटमध्ये सामावून घेतले जाणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराबाबत अधिकृत घोषणा झालेली नसली, तरी दिल्लीतील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

**शिवसेनेला ३ मंत्रिपदे; श्रीकांत शिंदे कॅबिनेटमध्ये?**

सध्या केंद्रात शिवसेनेचा एकच मंत्री (प्रतापराव जाधव) आहे. मात्र, 'ऑपरेशन टायगर'नंतर वाढलेल्या बळामुळे शिवसेनेला आता एक कॅबिनेट आणि दोन राज्यमंत्री अशी एकूण तीन मंत्रिपदे मिळण्याची चर्चा सुरू आहे. २०२४ मध्ये एनडीए सरकार स्थापन होताना शिवसेनेला कॅबिनेट मंत्रिपदाची ऑफर होती, मात्र डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ती नाकारली होती. त्यांचा 'आयुष मंत्रालयाचा स्वतंत्र प्रभार' कायम राहील, असेही सूत्रांकडून समजते. दरम्यान, राज्यमंत्रिपदासाठी धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचे नाव चर्चेत आहे.

## कळमजापूर येथे वीज कोसळून महिला शेतमजुराचा मृत्यू

### सहा महिला गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ चांदुर रेल्वे** अमरावती जिल्ह्यातील कळमजापूर येथे शेतात काम सुरू असताना अचानक वीज कोसळून सुनंदा सहारे या महिला शेतमजुराचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेत अन्य सहा महिला शेतमजूर गंभीर जखमी झाल्या आहेत. जखमींना तातडीने चांदूर रेल्वे



ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पावसाळ्यात वादळी पाऊस आणि विजांचा कडकडाट सुरू असल्याने नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन सुरक्षिततेची काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## उद्धव ठाकरेंच्या विदर्भ दौऱ्याचा परिणाम होणार नाही; शिंदे गटाचीच शिवसेना वाढेल - मंत्री उदय सामंत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती** शिवसेना (ठाकरे गट)चे सहा खासदार पक्षातून फुटल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या पार्श्वभूमीवर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे आजपासून विदर्भ दौऱ्यावर येत असून नागपुरातून दौऱ्याची सुरुवात करून ते यवतमाळकडे रवाना होणार आहेत. मात्र या दौऱ्याचा विदर्भातील राजकारणावर किंवा शिवसेनेच्या संघटनेवर कोणताही परिणाम होणार नसल्याचा दावा शिंदे गटाचे नेते तथा राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी अमरावती येथे पत्रकारांशी बोलताना केला.उदय सामंत म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी हा दौरा यापूर्वी केला असता तर त्याचा काहीसा सकारात्मक



परिणाम झाला असता. मात्र आता पक्षातील मोठी फूट पडल्यानंतर आणि परिस्थिती हाताबाहेर गेल्यानंतर दौरे करून कोणताही फायदा होणार नाही. राज्यातील महाविकास आघाडी पूर्णपणे विस्कळीत झाली असून घटक पक्षांमध्ये समन्वय उरलेला नाही, असा आरोपही त्यांनी केला.महाविकास आघाडीतील प्रत्येक पक्ष स्वतःला मोठा सिद्ध करण्याच्या प्रयत्नात असून त्यांच्यातच स्पर्धा सुरू आहे. त्यामुळे विरोधकांकडे जनतेसमोर ठोस दिशा किंवा एकसंघ नेतृत्व नसल्याचे सामंत यांनी म्हटले.

## युवा स्वाभिमान पार्टी व भाजपा द्वारा आयोजित गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळा थाटात

### मी कोणाच्याही दारात गेले नाही; विचारधारेशी तडजोड करणार नाही - नवनीत राणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती** अमरावती येथे आयोजित कार्यक्रमात राज्यसभा उमेदवारी आणि आगामी राजकीय वाटचालीवर भाष्य करताना माजी खासदार नवनीत राणा यांनी आपण कोणाच्याही दारात पदासाठी गेलो नसल्याचे स्पष्ट केले. राज्यसभेसाठी आपल्याला संधी मिळावी अशी इच्छा होती आणि त्यासाठी सुनेत्रा पवार तसेच देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही तिकीटासाठी मी कोणाच्याही दारात गेले नव्हते, असे त्या म्हणाल्या. पदे येतात-जातात, मात्र आपल्या विचारधारेशी तडजोड करणार नसून शेवटच्या श्वासापर्यंत त्यासाठी लढत राहणार असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी आपण पूर्ण तयारीत असून मैदानात उतरल्याचेही त्यांनी जाहीर केले. खासदार असताना अनेक विद्यार्थ्यांना संसद भवनाची भेट घडवून आणल्याची आठवण करून देत, सध्या ते शक्य नसल्याची खंत व्यक्त केली.

युवा स्वाभिमान पार्टी व भाजपा द्वारा आयोजित १० वी व १२ वी च्या गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक भवन, अमरावती येथील गुणगौरव सोहळ्यात



आ.रवि राणा व भाजपा नेत्या मा.खा.नवनित राणा यांच्या हस्ते ८३०० गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला

यावेळी अमरावती मनपा चे महापौर श्रीचंद तेजवानी, भाजपा जिल्हा शहर अध्यक्ष नितीन धांडे, उपमहापौर सचिन भेंडे, हरमन कंपनीचे संचालक हरप्रीत मिनहास व मेहर कौर मिनहास, युवा



स्वाभिमान जिल्हाध्यक्ष प्रकाश साबळे, माजी नगरसेविका जयश्री मोरय्या यांची प्रमुख उपस्थिती होती. गुणगौरव सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि महसुल मंत्री व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखरजी बावणकुळे यांनी फोनद्वारे उपस्थित विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन करुन दिल्या शुभेच्छा दिल्यात.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारासोबतच अमरावती जिल्ह्यात विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी अमरावतीला शैक्षणिक व औद्योगिक केंद्र बनविण्याचा आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा यांचा संकल्प यावेळी घेण्यात आला. आजचा हा गुणगौरव सोहळा केवळ विद्यार्थ्यांचा सन्मान नाही, तर त्यांच्या कष्टांचा, पालकांच्या त्यागाचा आणि शिक्षकांच्या परिश्रमांचा गौरव आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आम्ही नेहमीच त्यांच्या पाठीशी असल्याचे मत आ.रवी राणा यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केले. आ. रवि राणा आणि मा.खा. नवनित राणा यांनी अमरावती जिल्ह्यात अधिकाधिक उद्योग निर्माण करून विद्यार्थ्यांना स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा संकल्प व्यक्त केला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सातत्याने कार्य करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी व पालकांनी राणा दाम्पत्याचे आभार व्यक्त करत, विद्यार्थ्यांना दिलेला सन्मान आणि मातांचा केलेला गौरव हा अविस्मरणीय असल्याच्या भावना व्यक्त केल्या.या कार्यक्रमाचे संचालन प्रतिक्षा डांगे यांनी केले.

संपादकीय ......

# बालविवाहांच्या मुळाशी जाण्याची गरज

*महाराष्ट्र सरकार बालविवाह रोखण्यासाठी लग्नपत्रिकेवर वधू आणि वराची जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याच्या प्रस्तावाचा विचार करत आहे. बालविवाहासारख्या गंभीर सामाजिक प्रश्नावर सरकार काहीतरी करत आहे, अशी भावना या प्रस्तावामुळे निर्माण झाली. पण सार्वजनिक धोरणांच्या इतिहासाकडे पाहिले तर अशा अनेक निर्णयांचे वैशिष्ट्य एकच असते, ते दिसायला प्रभावी असतात; मात्र प्रत्यक्ष परिणामांच्या बाबतीत त्यांची मर्यादा लवकरच समोर येते. बालविवाह हा गरिबी, शिक्षणाचा अभाव, सामाजिक परंपरा, लिंगभेद, असुरक्षितता आणि ग्रामीण भागातील सामाजिक दबाव यांच्याशी जोडलेला प्रश्न आहे. त्यामुळे त्यावर उपाय शोधताना केवळ प्रशासकीय आदेश पुरेसे ठरत नाहीत. लग्नपत्रिकेवर जन्मतारीख छापण्याचा प्रस्तावही याच चौकटीत तपासण्याची गरज आहे. महाराष्ट्राने हा विचार राजस्थानच्या अनुभवातून घेतला आहे. राजस्थानमध्ये बालविवाहाचा प्रश्न अनेक दशकांपासून गंभीर मानला जातो. विशेषत: अक्षयतृतीयेच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर बालविवाह होत असतात. या पार्श्वभूमीवर राजस्थानमधील काही जिल्ह्यांत प्रथम प्रयोग म्हणून आणि नंतर व्यापक स्तरावर लग्नपत्रिकांवर वधू-वरांची जन्मतारीख छापण्याचे निर्देश देण्यात आले. छपाई करणार्या मुद्रकांना वयाचा पुरावा तपासण्यास सांगण्यात आले. प्रशासनाची कल्पना साधी होती. जर लग्नपत्रिकेवर वय स्पष्ट दिसत असेल तर गावातील नागरिक, स्थानिक प्रशासन, पोलीस किंवा बालसंरक्षण यंत्रणा यांना संशयास्पद विवाह ओळखणे सोपे जाईल.*

*ग्रामीण भागांत लोकांना कायदेशीर वयाबाबत अचूक माहिती नसते. पत्रिकेवरील जन्मतारीख हा एक प्रकारचा सार्वजनिक खुलासा ठरतो. दुसरा फायदा म्हणजे बालविवाह रोखण्याची जबाबदारी केवळ पोलीस किंवा महिला-बालविकास विभागावर राहत नाही. मुद्रक, पुजारी, विवाहस्थळ चालक, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक आणि नागरिक यांनाही संशयास्पद विवाह ओळखणे सोपे होते. तिसरा फायदा म्हणजे प्रशासनाला माहिती मिळण्याची शक्यता वाढते. पत्रिका, नोंदी आणि वयाचे पुरावे यांची शृंखला तयार झाली तर निरीक्षण अधिक प्रभावी होऊ शकते. याच प्रस्तावाच्या मर्यादाही तितक्याच गंभीर आहेत. सर्वात मोठी मर्यादा म्हणजे तो मूळ समस्येला स्पर्श करत नाही. बालविवाहाची कारणे आर्थिक आणि सामाजिक आहेत. मुलीचे शिक्षण थांबणे, कुटुंबाची आर्थिक अडचण, सुरक्षिततेची भीती, हुंड्याची मानसिकता किंवा सामाजिक दबाव यामुळे बालविवाह होतात. पत्रिकेवर जन्मतारीख छापल्याने या कारणांपैकी एकही कारण नाहीसे होत नाही. दुसरी मर्यादा म्हणजे प्रशासनाला कृती झाल्याचा आभास मिळतो. अनेकदा सरकारे जटिल प्रश्नांवर प्रतिकात्मक उपाय शोधतात. ते अंमलात आणायला सोपे असतात. जन्मतारीख छापण्याचा नियम हा अशाच प्रकारचा उपाय आहे. तो दिसतो, चर्चेत राहतो; पण त्याच्या परिणामकारकतेचे मोजमाप करणे कठीण असते. तिसरी मर्यादा म्हणजे अनुपालनाचा प्रश्न. महाराष्ट्रात दरवर्षी लाखो विवाह होतात. प्रत्येक पत्रिका तपासणे, प्रत्येक मुद्रकावर देखरेख ठेवणे, जन्मतारीख खरी आहे की नाही हे पडताळणे यासाठी प्रचंड प्रशासकीय यंत्रणा लागेल. प्रत्यक्षात हे कितपत शक्य आहे, हा प्रश्न उरतोच. चौथी मर्यादा म्हणजे डिजिटल युगातील बदल. आज अनेक विवाह निमंत्रणे व्हॉट्सअॅप, सोशल मीडिया किंवा ई-कार्डच्या स्वरूपात पाठवली जातात. अशा परिस्थितीत छापील पत्रिकांवर आधारित नियमाची उपयुक्तता मर्यादित राहू शकते. विवाहाची माहिती प्रसारित करण्याचे स्वरूपच बदलत असताना पारंपरिक पत्रिकेला केंद्रस्थानी ठेवलेला नियम भविष्यात कमी प्रभावी ठरू शकतो. खरं तर बालविवाह रोखण्यात जे उपाय सातत्याने परिणामकारक ठरले आहेत, ते वेगळ्या स्वरूपाचे आहेत. मुलींचे माध्यमिक आणि उच्च शिक्षण, शाळाबाह्य मुलींचा शोध, किशोरवयीन मुलींसाठी शिष्यवृत्ती, कौशल्य विकास, महिला स्वयंसहाय्य गटांचे बळकटीकरण, बालविवाह प्रतिबंधक अधिकार्यांचे जाळे आणि स्थानिक समुदायांचा सहभाग या उपायांचे परिणाम अधिक दीर्घकालीन दिसून आले आहेत. विवाहाच्या दिवशी हस्तक्षेप करण्यापेक्षा बालविवाहाची गरज निर्माण करणारी परिस्थिती बदलणे गरजेचे आहे.*


# मेळघाटातील कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजनांची गरज

**आमदार संजय खोडके प्रशासकीय यंत्रणा लपवित असल्याचा आरोप**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

शासनाच्या वतीने मातामृत्यू, बालमृत्यू रोखण्यासह कुपोषण मुक्तीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जात असला, तरीही कुपोषणग्रस्त भागातील परिस्थिती अजूनही चिंताजनक आहे. या गंभीर समस्येवर तात्पुरत्या सुधारणा न करता कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे, अशी आग्रही मागणी विधान परिषदेचे आमदार संजय खोडके यांनी विधिमंडळ अधिवेशनात लक्षवेधी सूचनेद्वारे केली.

आमदार संजय खोडके यांनी सभागृहात बोलताना प्रशासकीय यंत्रणेच्या कारभारावर तीव्र आक्षेप घेतला. ते म्हणाले की, शासकीय यंत्रणेकडून बालमृत्यूची खरी आकडेवारी लपवली जात असल्याने उपाययोजना करताना अडचणी येत आहेत. माहितीच्या अधिकारातून समोर आलेल्या धक्कादायक आकडेवारीनुसार, राज्यात वर्ष २०२५-२६ मध्ये १२ हजार बालमृत्यू झाले; तर त्यापूर्वी २०२१-२२ मध्ये १६ हजार आणि २०२४-२५ मध्ये १३ हजार बालमृत्यू झाले होते. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट-धारणी भागात कुपोषणामुळे बालमृत्यू आणि मातामृत्यूचे प्रमाण मोठे आहे. या भागात बालरोगतज्ज्ञ आणि रुग्णवाहिकांची टंचाई आहे. 'स्पर्श' योजनेतील रुग्णवाहिका चालकांना डिझेलचे पैसे वेळेवर न मिळाल्याने अनेकदा सेवा बंद पडते. तसेच महिला व बालविकास आणि आरोग्य विभागात मनुष्यबळाचा मोठा अभाव आहे. त्यामुळे केवळ शासकीय आकडेवारीवर अवलंबून न राहता, स्थानिक स्वयंसेवी संस्थांना सोबत घेऊन उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार



सार्वजनिक आरोग्य, महिला बालविकास आणि आदिवासी विकास विभागाने समन्वयाने काम करावे, अशी सूचना आ. खोडके यांनी केली.

लक्षवेधीला उत्तर देताना राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी सांगितले की, बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यात इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र आघाडीवर आहे. देशात नवजात मृत्यूचे प्रमाण १८ असताना महाराष्ट्रात ते १० आहे. अर्भक मृत्यूचे देशाचे प्रमाण २४ तर महाराष्ट्राचे १३ आहे.तसेच एकूण बालमृत्यूचा देशाचा दर २८ असून महाराष्ट्रात तो १५ इतका कमी आहे. तरीही, ही परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आणण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. कुपोषण निर्मूलनासाठी २०१३ मधील कोअर कमिटी, नंदुरबार जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील आदिवासी आरोग्य समिती आणि २०२५ मध्ये डॉ. दीपक सावंत यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेला 'राज्य कृती दल' (टास्क फोर्स) यांच्या माध्यमातून काम सुरू आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आरोग्य, महिला-बालविकास आणि आदिवासी विभाग एकत्रितपणे काम करून कुपोषणबाधित क्षेत्रात बालमृत्यू रोखण्यासाठी विशेष उपाययोजना करेल, अशी ग्वाही मंत्र्यांनी सभागृहात दिली.-

## अमरावती जिल्ह्यात प्रशासकीय पुनर्रचना:

# अचलपूर येथे 'अपर जिल्हाधिकारी कार्यालय' प्रस्तावित; १४ तालुक्यांची होणार नवी विभागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती,** जिल्ह्यातील नागरिकांच्या सोयीसाठी आणि प्रशासकीय कामांना गती देण्यासाठी अमरावती जिल्ह्यामध्ये आता अचलपूर येथे नवीन 'अपर जिल्हाधिकारी कार्यालय' प्रस्तावित करण्यात आले आहे. या नव्या कार्यालयाच्या स्थापनेमुळे जिल्ह्यातील एकूण १४ तालुक्यांची विभागणी दोन मुख्य कार्यालयांमध्ये केली जाणार आहे. प्रस्तावित आराखड्यानुसार, नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालयाचे मुख्यालय हे अचलपूर येथे असेल. या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रामुख्याने मेळघाट आणि परिसरातील ६ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये अचलपूर, चांदूर बाजार, दर्यापूर, अंजनगाव, चिखलदरा आणि धारणी या तालुक्यांचा समावेश आहे. या दुर्गम आणि मोठ्या तालुक्यांमधील नागरिकांना विविध महसुली व प्रशासकीय कामांसाठी आता थेट अमरावतीला येण्याची गरज पडणार नाही, ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचणार आहे.



तसेच मुख्य जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या थेट अखत्यारीत उर्वरित ८ तालुके कायम राहणार आहेत. यामध्ये अमरावती शहर व ग्रामीण, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे, मोर्शी, वरुड, तिवसा आणि भातकुली या तालुक्यांचा समावेश असेल. या विभागणीमुळे प्रशासकीय कामांचे विकेंद्रीकरण होऊन कामांचा निपटारा अधिक वेगाने होण्यास मदत होणार आहे.१५ दिवसांत हरकती नोंदवण्याचे आवाहन अचलपूर येथील प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्राबाबत नागरिकांच्या काही हरकती किंवा सूचना असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जिल्हाधिकारी कार्यालयात लेखी स्वरूपात सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.मिळालेल्या मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नसल्याने, नागरिकांनी आपल्या सूचना वेळेत मांडण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## संत गुलाब बाबा अवतर दिनानिमित्त


# गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य; गुणवंतांचा होणार सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अंजनगाव** तीर्थक्षेत्र टाकरखेडा-मोरे येथील श्री सिद्धेश्वर संत गुलाब बाबा यांच्या अवतर दिनानिमित्त राजश्री प्रतिष्ठानतर्फे सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, ५ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता शिव मंगल कार्यालय येथे हा कार्यक्रम होणार आहे.या उपक्रमाअंतर्गत गावातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील इयत्ता पहिली ते पाचवीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना दप्तर, पाण्याची बाटली, कंपास पेटी आदी शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. तसेच नुकत्याच जाहीर झालेल्या दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.राजश्री प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते मंगेश भाऊसोनार यांनी सांगितले की, संत गुलाब बाबांनी दिलेल्या सेवेच्या विचारातून प्रेरणा घेऊन हा उपक्रम राबविण्यात येत आहे. आर्थिक अडचणीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.या उपक्रमाचा लाभ जास्तीत जास्त गरजू विद्यार्थी व पालकांनी घ्यावा, असे आवाहन राजश्री प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले असून या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.-



# बिहालीच्या अंगणवाडीत घुसला साप

## सेविकेमुळे चिमुकले बचावले, कायमस्वरूपी उपाययोजना करा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मेळघाट**

पावसाळ्यामुळे सापांचे बिळातून बाहेर पडण्याचे प्रमाण वाढले असून मेळघाटातील अंगणवाड्यांमध्येही त्यांची दहशत वाढत आहे. अचलपूर तालुक्यातील बिहाली अंगणवाडी केंद्रात नुकत्याच घडलेल्या घटनेत अंगणवाडीत भलामोठा साप आढळल्याने एकच खळबळ उडाली. मात्र अंगणवाडी सेविकेच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली आणि चिमुकले बचावले. सकाळच्या वेळी अंगणवाडीत पोषण आहारासाठी बालकांची गर्दी असतानाच साप आढळून आला.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सेविकेने सर्वप्रथम बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. त्यानंतर सर्पमित्राला पाचारण करण्यात आले आणि सापाला सुरक्षितरीत्या पकडून बाहेर सोडण्यात आले. या घटनेमुळे अंगणवाडीतील बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मेळघाटातील विविध अंगणवाड्यांमध्ये यापूर्वीही साप निघाल्याच्या घटना घडल्या आहेत. सुदैवाने आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे पालक आणि ग्रामस्थांमध्ये चिंता वाढली आहे.

अंगणवाड्यांमध्ये पोषण आहाराचे अन्नधान्य साठवले जात असल्याने उंदरांचे प्रमाण वाढते. उंदरांच्या शोधात साप अंगणवाड्यांच्या परिसरात येत असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे महिला व बालविकास विभागाने या समस्येकडे गांभीर्याने पाहून कायमस्वरूपी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची मागणी होत आहे.सापांचा धोका टाळण्यासाठी काय करावे? अंगणवाडी परिसरातील गवत, झुडुपे व रानटी झाडे नियमित कापून स्वच्छता राखावी. इमारतीभोवती असलेले विटा, दगड व लाकडांचे ढिगारे हटवावेत. भिंती, फरशी व दरवाजांजवळील भेगा व छिद्रे सिमेंटने बंद करावीत. उंदरांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात. परिसरात पुरेशा प्रकाशाची व्यवस्था करावी. नियमित कीटक व उंदीर नियंत्रण मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे.

> अंगणवाडीत साप निघणे ही अत्यंत गंभीर आणि चिंतेची बाब आहे. यामुळे लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. भविष्यात असे प्रसंग टाळण्यासाठी तातडीने आणि कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे.
> **राजकिशोर साखरे,** सामाजिक कार्यकर्ते, मेळघाट.

# पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी २० जुलैपासून नि:शुल्क स्पर्धा परीक्षा वर्ग

## प्रवेशासाठी १२ जुलैला विद्यापीठात निवड चाचणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी २० जुलैपासून नि:शुल्क स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. हे वर्ग सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत होतील.





या मार्गदर्शन वर्गात विद्यार्थ्यांना एमपीएससी, यूपीएससी, बँक आणि स्टाफ सिलेक्शन कमिशन (एसएससी) यांसारख्या विविध स्पर्धा परीक्षांसाठी अनुभवी मार्गदर्शकांकडून आवश्यक माहिती व मार्गदर्शन मिळेल. हा वर्ग तीन महिन्यांच्या कालावधीचा असेल.

या वर्गात प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची निवड चाचणी १२ जुलै रोजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागात सकाळी ११ वाजता घेण्यात येणार आहे. निवड चाचणीत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा तयारीसाठी व्यापक प्रशिक्षण मिळेल. नोंदणीसाठी विद्यार्थ्यांनी https://forms.gle/t2S-6VwJWNvdKD57 या गुगल फॉर्मवर अर्ज करणे आवश्यक आहे.कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे आणि कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. के.सी. मोरे (वनस्पतीशास्त्र विभाग) यांच्याशी ९६०४३५८५१८ या भ्रमणध्वनीवर किंवा entry2servicess gbau.ac.in या ईमेलवर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाने कळवले आहे.

# वाकलेल्या वीजखांबामुळे धोका

## महावितरणने तत्काळ दखल घेण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६टा. शंभू-** परिसरातील मुख्य मार्गावरील एक वीजखांब वाकलेला आहे. त्यामुळे वारंवार अपघात घडत आहेत. रस्त्यावरून ये-जा करणारी वाहने अनेकदा या खांबाला धडक देत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर खांबावर सुमारे १०० ते १५० वीजजोडण्या असल्याचे सांगण्यात येत आहे. वाहनांच्या धडकेमुळे अनेकदा वीजतारा तुटतात, परिणामी एक ते दोन तास वीजपुरवठा खंडित राहतो. याचा मोठा फटका विद्यार्थी, व्यावसायिक, दुकानदार तसेच सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. यासंदर्भात काही नागरिकांनी महावितरणकडे ऑनलाइन तक्रार दाखल केली असून संबंधित विभागाने तातडीने



दखल घेऊन हा वीजखांब सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी महावितरणने त्वरित उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे.

# शिरजगाव मोझरीतील रस्ते आले पाण्याखाली

## पावसाच्या पाण्यासह सांडपाणी रस्त्यावर,आरोग्याचा प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ शि.मोझरी –** तिवसा तालुक्यातील शिरजगाव मोझरीत झालेल्या पहिल्याच पावसात गावातील मुख्य रस्ता पाण्याखाली आल्याने नागरिकांची चांगलीच गैरसोय झाली. दुचाकीसह मोठ्या वाहन चालकांना वाट काढण्यात अडचणीचा सामना करावा लागत आहे. तर सांडपाणी रस्त्यावरून वाहत असल्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. नुकतेच ग्रामपंचायत प्रशासनाकडून मुख्य बाजारपेठ असलेल्या रस्त्यावर लाखो रुपये खर्च करून पेव्हिंग ब्लॉग तसेच काँक्रिटीकरण करण्यात आले. मात्र हे काम अतिशय निकृष्ट असल्याचा आरोप येथील नागरिकांकडून केला जात आहे.गेल्या दोन वर्षांपासून गावातील नागरिकांनी ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक यांना वारंवार सूचना देऊन सुद्धा कुठल्याही उपाययोजना केल्या नसल्याचा आरोपदेखील नागरिकांकडून केला जात आहे.



> दोन वर्षांआधी ग्रामपंचायतने गावातील मुख्य रस्ता हा जेसीपीच्या साहाय्याने पाइप टाकण्याकरिता खोदला, त्यानंतर रस्त्याची संपूर्ण दुरुस्ती करू, असे आश्वासन दिले होते. मात्र दोन वर्षे उलटूनही तो मुख्य रस्ता जसाच्या तसाच आहे. याला जबाबदार ग्रामपंचायत प्रशासन आहे.
> **–संदीप हगवणे,** शिरजगाव मोझरी.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# वरुणराजा बरसला: दोन दिवसांतच २५ हजार हेक्टरवर विक्रमी पेरणी, कपाशीलाच अधिक पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

अमरावती यंदा मान्सून सुमारे पंधरा दिवस उशिराने दाखल झाला असला, तरी जिल्ह्यात झालेल्या पहिल्याच दमदार आणि सार्वत्रिक पावसामुळे खरीप पेरण्यांना वेग आला आहे. त्यामुळेच मागील दोन दिवसांत जिल्ह्यात विक्रमी २५ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली असून जिल्ह्यात आतापर्यंत एकूण २८ हजार हेक्टरवर पेरणी झाल्याचे कृषी विभागाने सांगितले आहे. पेरण्यांना उशीर झाल्याने यंदा अधिकाधिक शेतकरी कपाशीला प्राधान्य देत असल्याचे चित्र आहे. मात्र बियाणे, ट्रॅक्टर भाडे, रासायनिक खते आणि तणनाशकांच्या वाढलेल्या दरांमुळे शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. बुधवारी जिल्ह्यात मान्सूनचे दमदार आगमन झाले. बहुतांश तालुक्यांत ५० मिमीपेक्षा अधिक पाऊस नोंदविला गेला. जूनचा शेवटचा आठवडा सुरू असताना झालेल्या या पावसामुळे शेतकऱ्यांनी पेरण्यांना सुरुवात केली. काही भागांत मान्सूनपूर्व पेरणी झाली होती; मात्र बुधवारी झालेल्या पावसानंतर गुरुवार आणि शुक्रवार या दोन दिवसांत पेरण्यांना मोठी गती मिळाली. यावर्षी शेतकऱ्यांना कमी पावसाच्या शक्यतेबरोबरच वाढलेल्या कृषी निविष्ठांच्या दरांचाही सामना करावा लागत आहे. खतांच्या किमतींमध्ये २५ टक्क्यांहून अधीक वाढ झाली.



### खतांच्या दरात मोठी उसळी

२०:२०:०:१३ हे खत मागील वर्षी सुमारे १,२५० रुपयेप्रति बॅग होते; यंदा ते थेट २ हजार १५० रुपयांपर्यंत पोहोचले आहे. १२:३२:१६ खताचा दर १,४५० रुपयांवरून १,८०० रुपयांपर्यंत वाढला आहे.

### ट्रॅक्टर भाड्यातही प्रतिएकर २०० ते ३०० रुपयांनी वाढ

आखाती देशातील युध्दामुळे तसेच इंधनदरवाढीचा फटका शेती क्षेत्रालाही बसला आहे. डिझेलच्या वाढलेल्या किमतीमुळे पेरणीसाठी ट्रॅक्टर भाड्यात प्रति एकर सुमारे २०० ते ३०० रुपयांची वाढ झाली आहे. मागील वर्षी प्रति एकर सुमारे ८०० ते ९०० रुपये असलेला दर यंदा १,१०० ते १,२०० रुपयांपर्यंत पोहोचला.

# ज्येष्ठ पत्रकार कृष्णा लोखंडे यांना वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२६अमरावती** राज्य शासनाच्या कृषी विभागाकडून कृषीक्षेत्रात उल्लेखनिय योगदान देणाऱ्या व्यक्तींना विविध पुरस्कारांनी सन्मानित केले जाते. यंदाचे कृषी पुरस्कार जाहिर करण्यात आले असून दैनिक 'सकाळ'चे अमरावतीचे वरिष्ठ बातमीदार कृष्णा यशवंतराव लोखंडे यांना यंदाचा प्रतिष्ठित वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. कृषी क्षेत्रातील अभ्यासपूर्ण व सातत्यपूर्ण लिखाण करुन शेतकऱ्यांसह शेतीतील प्रश्न आपल्या लिखाणातून मांडणाऱ्या पत्रकारांना या पुरस्काराने सन्मानित केले जाते. १ जुलै रोजी मुंबई येथे राज्यपालांच्या उपस्थितीत त्यांना या पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. याशिवाय अमरावती जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात कार्य करणाऱ्या अन्य व्यक्तींचाही या यादीमध्ये समावेश आहे. त्यामध्ये अचलपूर तालुक्यातील भिलोना येथील राहूल साहेबराव उभाले यांना वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार, दर्यापूर तालुक्यातील पनोरा येथील कुलदीप गजानन टोळे यांना युवा शेतकरी पुरस्कार, मोर्जी येथील नवीनकुमार अरुण पेठे यांना उद्यानपंडित पुरस्कार, वरुड बेबील रामभाऊ महादेवराव ढोरे यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार (सर्वसाधारण गट) तसेच आदिवासी गटातून धारणी तालुक्यातील टिटंबा येथील रामगोपाल सखाराम मावस्कर यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार तसेच भातकुली येथील सहायक कृषी अधिकारी रुपाली वसंतराव ठाकरे यांना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार जाहीर झाला आहे.



१ जुलैला दुपारी एक वाजता सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियममधील नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया डोम वरळी येथे राज्यपाल विष्णुदेव वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, कृषी राज्यमंत्री आशीष जैस्वाल आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कारप्राप्त व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

# शिक्षकांना द्यावी लागणार टीईटी परीक्षा

## नोकरी टिकवण्यासाठी १८ हजार शिक्षक ३८ केंद्रांवर चाचणी देणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

एरवी विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणाऱ्या शिक्षकांना आता स्वतःचीच परीक्षा द्यावी लागणार आहे. शासनाने सप्टेंबर २०२८ पूर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण करणे अनिवार्य केले असल्याने, नोकरी वाचवण्यासाठी शिक्षकांची धडपड सुरू झाली आहे. आगामी रविवार, २८ जून रोजी ही परीक्षा होणार आहे.

या परीक्षेसाठी अमरावती तालुक्यात ३८ केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. एकूण १८ हजार ११९ शिक्षकांनी परीक्षेसाठी ऑनलाइन नोंदणी केली आहे, ज्यात ७ हजार ३९१ प्राथमिक आणि १० हजार ७२८ माध्यमिक शिक्षक आहेत. प्रत्यक्ष किती शिक्षक उपस्थित राहतात, हे रविवारी स्पष्ट होईल.

परीक्षेत पहिली ते चौथीच्या प्राथमिक शिक्षकांसाठी वेगळी आणि सहावी ते आठवीच्या



माध्यमिक शिक्षकांसाठी वेगळी अशा दोन स्वतंत्र प्रश्नपत्रिका असतील. प्राथमिक शिक्षकांची परीक्षा सकाळी १०.३० वाजता, तर माध्यमिक शिक्षकांची परीक्षा दुपारी २.३० वाजता सुरू होईल. दोन्ही पेपर प्रत्येकी अडीच तासांचे असतील.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा संनियंत्रण समिती या परीक्षेचे आयोजन करत आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी या समितीचे उपाध्यक्ष आहेत, तर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सचिव म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.

परीक्षा अत्यंत पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे देखरेख ठेवली जाईल. गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी, सीईओ यांच्यासह पोलीस आयुक्त कार्यालयाचे अधिकारीही परीक्षा केंद्रांना भेटी देणार आहेत. प्राथमिक, माध्यमिक आणि योजना विभागाच्या शिक्षणाधिकाऱ्यांची भरारी पथकेही अचानक तपासणी करतील.

परीक्षेची प्रक्रिया अधिक सुरक्षित करण्यासाठी बायोमॅट्रिक, स्क्रीनिंग आणि फेस रेकग्निशन तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. ही सर्व तांत्रिक पडताळणी वेळेत पूर्ण होणे आवश्यक असल्याने, सर्व परीक्षार्थ्यांनी परीक्षा केंद्रांवर वेळेपूर्वीच उपस्थित राहावे, असे आवाहन सदस्य सचिवांनी केले आहे.

# दीड वर्षापासून उच्छाद मांडणारे दोन चोरटे फ्रेजरपुरा पोलिसांच्या जाळ्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

शहरातील विविध पोलीस स्टेशनच्या हद्दीत गेल्या दीड वर्षांपासून घरफोडी आणि चोऱ्यांचे सत्र राबवून पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना फ्रेजरपुरा पोलिसांनी अटक केली आहे. या दोघांकडून चोरी, घरफोडीचे नऊ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले असून, त्यांच्याकडून सोन्याची लगड, ३.६९ लाखांची रोख आणि दुचाकी वाहनांसह एकूण २४ लाख २२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

भारत दिलीप पवार (२५, रा. जुना कॉटन मार्केट, अमरावती) आणि पवन सुभाष चक्रे (३२, रा. न्यू हनुमान नगर, अमरावती) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत. किरण नगर भागातील रवींद्र गुप्ता यांनी १८ जून २०२५ रोजी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.

१७ जूनच्या रात्री दुकान बंद करून गेल्यानंतर, अज्ञात चोराने रात्रीच्या सुमारास दुकानाचे शटर अर्धे वाकवून आत प्रवेश केला आणि गल्ल्यातील १२ हजार रुपयांची रोकड लंपास केली. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोराविरुध्द गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. दरम्यान या चोरीच्या गुन्ह्याचा शोध घेत असताना फ्रेजरपुरा पोलीस



ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे भारत पवार आणि पवन चक्रे यांना त्यांच्या राहत्या परिसरातून संशयाच्या आधारे ताब्यात घेतले. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या या दोघांना पोलिसांनी खाक्या दाखवताच त्यांनी स्वस्तिक किराणा दुकानातील चोरीची कबुली दिली.

पोलिसांनी या दोन्ही चोरट्यांची कसून चौकशी केली असता, त्यांनी मागील दीड वर्षात शहरातील चार पोलीस ठाण्यांच्या हद्दीत घरफोड्या केल्याची कबुली दिली. यामध्ये गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ३, राजापेठ हद्दीतील २, बडनेरा हद्दीतील १ आणि फ्रेजरपुरा हद्दीतील ३ गुन्हे अशा एकूण ९ चोऱ्यांची कबुली दिली आहे. ही कारवाई फ्रेजरपुराचे ठाणेदार रवींद्र राजुलवार, डीबीचे प्रमुख पीएसआय राहुल महाजन, सुभाष पाटील, रज्जाक शेकुवाले, सचिन बोरकर, सुरज यादव, अखिल दळवी, जयेश परिवाले, रोशन वऱ्हाडे, प्रशांत वानखडे, सागर चव्हाण, जावेद पटेल, धर्मा शिंदे, अमोल राठोड व उमेश चुलपार यांनी केली आहे.

### २४.२२ लाखांचा मुद्देमाल जप्त

अटक केलेल्या चोरट्यांकडून पोलिसांनी १८.५८ लाख रुपयांचे १३४ ग्रॅम ९७० मिलिग्राम सोन्याची लगड. ३ लाख ६९ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेल्या १ लाख ९५ हजार रुपये किमतीच्या ४ दुचाकी असा एकूण २४ लाख २२ हजार ५०० रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.-

# नाफेडच्या ज्वारी खरेदीत घोळ

## शेतकर्यांच्या नावावर व्यापार्यांचीच चांदी

## शिवसेनेकडून चौकशीची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६नांदगाव खंडेश्वर-** नांदगाव खंडेश्वर तालुक्यात नाफेड व शेतकी खरेदी-विक्री सहकारी संस्थेमार्फत सुरू असलेल्या ज्वारी खरेदी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप होत असून, काही व्यापारी शेतकर्यांच्या नावाचा वापर करून ज्वारी विक्री करीत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या संदर्भात शिवसेना (शिंदे गट) तालुका पदाधिकार्यांनी प्रभारी तहसीलदार एस. व्ही. देशपांडे यांना निवेदन देऊन उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यात अनेक ठिकाणी ज्वारीचे पीक नसतानाही बनावट सातबारा उतारे व पीक नोंदीच्या आधारे नाफेडमध्ये नोंदणी करण्यात आल्याची शक्यता आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार तालुक्यात केवळ ५८ हेक्टर क्षेत्रावर ज्वारीची लागवड झाली होती. या क्षेत्रातून अंदाजे ३ हजार क्विंटल उत्पादन अपेक्षित असताना नाफेडमार्फत ९७ शेतकर्यांकडून तब्बल ७,०५८ क्विंटल ज्वारीची खरेदी झाल्याचे समोर आले आहे. काही लाभार्थ्यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे ज्वारीची मोजणी करून शासकीय योजनेचा लाभ घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार, फक्त ५८ हेक्टर क्षेत्रावर ज्वारी लागवड झाली असताना नाफेडमध्ये तब्बल ४७५ शेतकर्यांची नोंदणी कशी झाली, प्रत्यक्षात क्षेत्रात ज्वारी नसताना खरेदी केंद्रांवर आलेली ज्वारी कुठून आली, बनावट सातबारा व पीक नोंदी कोणी तयार केल्या, यामध्ये व्यापारी, दलाल की बनावट शेतकरी सहभागी आहेत, संबंधित अधिकार्यांनी वेळेत कारवाई का केली नाही, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.यावेळी सुनील केने, प्रशांत वैघ, राजेंद्र लेंडे, पवन ठाकरे, दिलीप डोईफोडे, नंदकिशोर इंगळे, सुनील बनसोड, विवेक भगत, मंगेश मानके, अमोल सावदे, एकांत शिरभाते, नितीन रावेकर, मनोज जैन व ऋतिक गुल्हाने उपस्थित होते. याबाबत बोलताना तालुका कृषी अधिकारी विकास पाटील म्हणाले की, नांदगाव खंडेश्वर तालुक्यात रब्बी हंगामात १० हेक्टर तर उन्हाळी हंगामात ५७ हेक्टर क्षेत्रावर ज्वारीची लागवड झाल्याची नोंद आहे. या पिकाची सरासरी उत्पादकता प्रति हेक्टर ३० क्विंटल राहण्याचा अंदाज विभागाने व्यक्त केला आहे.

# मनपाची शहर बससेवेस नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

# कंत्राटदार कंपनीस सवलतीसाठी सोमवारी बैठक


**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती-**

अमरावती शहराची जीवनवाहिनी असलेल्या शहर बससेवेस नवीन बससेवा सुरू होईस्तोवर मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे अमरावतीकर प्रवाशांना दिलासा मिळाला असून ही सेवा आता नोव्हेंबर अखेरपर्यंत सुरळीत राहणार आहे. तथापि सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदार कंपनीस काय सवलती द्यायच्या हे सोमवारी होणाऱ्या बैठकीत निश्चित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. शहरातील बससेवा पुरविण्याचे कंत्राट साहू टूर्स अँड ट्रॅव्हल्स, या कंपनीला देण्यात आले आहे. या कंपनीचा करार गेल्या महिन्यापूर्वी २४ मे रोजी संपुष्टात आल्यानंतर समस्या उद्भवली होती. दरम्यान याच काळात विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने तात्पुरती व्यवस्था म्हणून आयुक्त वर्षा लड्डा यांनी एक महिन्याची मुदतवाढ दिली, मात्र सवलती देता आल्या नव्हत्या. ही मुदत गुरुवार २५ जूनला संपुष्टात आल्याने पुन्हा संकट उत्पन्न झाले होते. महापालिकेस पन्नास ई-बसेस मंजूर असून त्यासाठी बसडेपो व चार्जिंग स्टेशन उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे मनपा प्रशासनाने म्हटले आहे. सत्तर टक्के काम पूर्ण झाले असून तीस टक्क्यांसाठी नोव्हेंबर उजाडण्याची शक्यता आहे. दरम्यान दोन ऑक्टोबरपासून नवीन बससेवा नागरिकांच्या सेवेत रूजू करण्याचे प्रयत्न असल्याचेही प्रशासनाने म्हटले आहे. विद्यमान स्थितीत साहू टूर्स अँड ट्रॅव्हल्स या कंपनीच्या अकरा बसेस रस्त्यावर धावत आहेत. मोजक्या सहा मार्गांवर ही सेवा उपलब्ध असून कंपनी तोट्यात असल्याने सेवा पुरविण्यास असमर्थ असल्याचे कंत्राटदार कंपनीने पहिली मुदत संपली तेव्हाच मनपा आयुक्तांना स्पष्ट केले होते. मात्र अचानक सेवा बंद पडल्यास नागरिकांना त्रास सहन करण्याची वेळ येणार असल्याने कंत्राटदारास तोटा सहन करता येऊ शकेल, अशा सवलती देण्याचे आश्वासन गत महिन्यात झालेल्या बैठकीत देण्यात आले होते. त्यावेळी आचारसंहितेच्या अडचणीमुळे तत्काळ काही सवलती देता आल्या नाहीत. आता आचारसंहिता संपल्याने सवलती देण्यावर विचारविमर्श करण्यासाठी येत्या सोमवारी (ता.२९) पुन्हा बैठक घेण्यात येणार आहे. सोमवारी आयुक्तांच्या अध्यक्षतेत होत असलेल्या बैठकीत सवलतीसंदर्भातील निर्णय होणार आहे.



शहर बससेवा ही अमरावतीकरांसाठी महत्त्वाची व जिव्हाळ्याची आहे. ती अचानक बंद करण्यात येणार नाही. मनपा प्रशासनाने नवीन सेवा रूजू होईस्तोवर विद्यमान सेवा सुरळीत ठेवण्यास सांगितले आहे. कंपनीला दरमहा तीन ते साडेतीन लाख रुपयांचा तोटा सहन करावा लागत असल्याने असमर्थता दर्शवत सवलतींची मागणी केली आहे. त्यावर आगामी बैठकीत निर्णय होणार आहे.

**राजेश गोफणे,** व्यवस्थापक, साहू टूर्स अँड ट्रॅव्हल्स.



# ...अखेर गोविंद पिंजरकर यांची झुंज अपयशी

## २४ जून रोजी मॉर्निंग वॉक दरम्यान रानडुक्कराने केला प्राणघातक हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२७अमरावती** शहरातील शेगाव रोडवरील आशियाड कॉलनी परिसरात दिनांक २४ जून रोजी पहाटे मॉर्निंग वॉक दरम्यान रानडुकराच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या गोविंद पिंजरकर (वय ७५) या ज्येष्ठ नागरिकाची मृत्यूशी झुंज अखेर अपयशी ठरली आहे. खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांनी सकाळी ६ वाजता अखेरचा श्वास घेतला. या दुर्दैवी मृत्यूनंतर आज दोन दिवसांनीही आशियाड कॉलनी व परिसरात प्रचंड शोककळा आणि भीतीचे वातावरण असून, प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे.गत बुधवारी (२४ जून) पहाटे सव्वा पाचच्या सुमारास आशियाड कॉलनीचे रहिवासी गोविंद पिंजरकर हे नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडले होते. कॉलनीतील विघ्नहर्ता गणपती मंदिरासमोरील मोकळ्या जागेतून अचानक आलेल्या एका पिसाळलेल्या रानडुकराने त्यांच्यावर अत्यंत भीषण हल्ला चढवला. हा हल्ला इतका भयंकर होता की, डुकराने पिंजरकर यांच्या संपूर्ण अंगावर ठिकठिकाणी गंभीर चावे घेतले, ज्यामध्ये त्यांना आपले एक बोटही गमावावे लागले होते प्रत्यक्ष वर्षी असलेले ज्येष्ठांनीसुद्धा या घटनेची धास्ती घेतली आहे. या घटनेची थरारक दृश्ये परिसरातील सीसीटीव्ही (उउढत) कॅमेऱ्यात कैद झाली असून, हा अंगावर काटा आणणारा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर संपूर्ण अमरावती शहर हादरले आहे.

# मोर्शी विधानसभा मतदारसंघात ड्रग्स एमडी गांजाचा शिरकाव!



## माजी आमदार देवेंद्र भुयार यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कठोर कार्यवाहीची मागणी !


**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७वरूड** मोर्शी विधानसभा मतदारसंघात वरूड मोर्शी तालुक्यामध्ये दिवसेंदिवस वाढत असलेल्या ड्रग्स एमडी गांजाच्या विळख्यामुळे तरुण पिढीचे भविष्य धोक्यात येत असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. शहरासह ग्रामीण भागातही ड्रग्स एमडी गांजा या अमली पदार्थांचा वापर आणि त्याची विक्री वाढत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत असून पालक, शिक्षक आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी राज्य शासन व पोलीस प्रशासनाचे लक्ष वेधत मोर्शी विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या ड्रग्सच्या अवैध साखळीवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. देवेंद्र भुयार यांनी म्हटले आहे की, तरुणाई ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. मात्र वाढत्या व्यसनाधीनतेमुळे अनेक युवकांचे शिक्षण, करिअर आणि कुटुंब उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे केवळ किरकोळ आरोपींवर कारवाई करून प्रश्न सुटणार नाही, तर या अवैध व्यवसायामागील मुख्य सूत्रधार आणि पुरवठादारांपर्यंत पोहोचून त्यांचे संपूर्ण नेटवर्क उद्ध्वस्त करणे आवश्यक आहे.यावेळी मोर्शी विधानसभा मतदारसंघात विशेष एमडी गांजा ड्रग्सविरोधी मोहीम राबवावी. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी नियमित तपासणी करावी. ड्रग्स विक्रेते व पुरवठादारांवर कठोर कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करावेत. युवकांमध्ये जनजागृती अभियान राबवून व्यसनमुक्ती केंद्रांना बळ द्यावे. पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश करावा. युवा पिढीचे भविष्य वाचविण्यासाठी निर्णायक लढा आवश्यक असून मोर्शी विधानसभा मतदारसंघातील वाढत्या ड्रग्सच्या संकटामुळे अनेक कुटुंबांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. वेळेवर कठोर पावले उचलली नाहीत तर भविष्यात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

# समर्थ महाविद्यालयाजवळ भीषण अपघात ; तरुणाचा जागीच मृत्यू

## एकाची मृत्यूशी झुंज, चालक पोलिसांच्या ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती,**

अमरावती शहरातील समर्थ महाविद्यालयाजवळील राजापेठ-बडनेरा रोडवर शुक्रवारी पहाटे सुमारे ५.४५ वाजता झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी असून त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालय (इरविन) येथे उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.मृत तरुणाची ओळख स्वमील उर्फ गोलू सारंगधर पाटील (वय २८, रा. मालखेड, ता. चांदूर रेल्वे) अशी झाली आहे. अपघातात त्यांच्यासोबत असलेले अभिषेक शंकर वानखडे (वय २४, रा. गोपाल नगर, अमरावती) गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे.प्राथमिक माहितीनुसार, चक-२७ इद-७५७० क्रमांकाच्या बोलेरो पिकअप वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने हा भीषण अपघात झाला. धडकेची तीव्रता इतकी मोठी होती की दुचाकीचा चुराडा झाला आणि स्वमील पाटील यांचा घटनास्थळीच दुर्दैवी मृत्यू झाला. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू करत जखमीला रुग्णालयात दाखल केले.या प्रकरणी बोलेरो पिकअपचा चालक निखिल निर्मल कुशवाह (वय १९, रा. सातूर्णा डीपीएस रोड, क्रांती कॉलनी, अमरावती) याला राजापेठ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू आहे.घटनास्थळी फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले असून पंचनामा करण्यात आला आहे. जखमी अभिषेक वानखडे यांच्या जबाबानंतर संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पहाटेच्या सुमारास घडलेल्या या दुर्घटनेमुळे राजापेठ-बडनेरा रोड परिसरात काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.



# भरधाव खासगी बस दुकानांवर आदळली अपघातामध्ये चार ते पाच जण जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अकोला-**

अनियंत्रित भरधाव खासगी बसने रस्त्याच्या कडेवरील तीन ते चार टीन-पत्र्याच्या दुकानांना चिरडल्याची भीषण दुर्घटना वाशीम शहराजवळ आज, २६ जूनला पहाटे घडली. या थरारक अपघातामुळे एकच गोंधळ उडाला. या अपघातामध्ये चार ते पाच जण जखमी झाले आहेत. अपघातामुळे चांगलीच खळबळ उडाली. नागपूरवरून परभणीच्या दिशेने जाणाऱ्या खुराणा ट्रॅव्हल्सच्या बसवरील चालकाचे नियंत्रण सुटले. वाशीम शहरालगतच्या पुसद महामार्गावरील रेल्वे उड्डाणपुलाजवळ भरधाव धावणारी ही खासगी बस थेट दुभाजकांवर आदळली. वेगामुळे दुभाजक तोडून रस्त्याकडेला असलेल्या तीन ते चार दुकानांवर गेली. या भरधाव खासगी बसने समोरील टीन पत्र्याची दुकाने संपूर्णत: उद्ध्वस्त केले. प्रचंड आवाजामुळे गाढ झोपेत असलेल्या प्रवाशांना मोठा धक्का बसला. एकच गोंधळ उडाला. बसमध्ये एकूण ३० प्रवासी होते. या घटनेने प्रवाशांमध्ये प्रचंड भीती पसरली.नागपूरवरून परभणीच्या दिशेने जाणाऱ्या खुराणा ट्रॅव्हल्सच्या बसवरील चालकाचे नियंत्रण सुटले. वाशीम शहरालगतच्या पुसद महामार्गावरील रेल्वे उड्डाणपुलाजवळ भरधाव धावणारी ही खासगी बस थेट दुभाजकांवर आदळली. वेगामुळे दुभाजक तोडून रस्त्याकडेला असलेल्या तीन ते चार दुकानांवर गेली. या भरधाव खासगी बसने समोरील टीन पत्र्याची दुकाने संपूर्णत: उद्ध्वस्त केले. प्रचंड आवाजामुळे गाढ झोपेत असलेल्या प्रवाशांना मोठा धक्का बसला. एकच गोंधळ उडाला. बसमध्ये एकूण ३० प्रवासी होते. या घटनेने प्रवाशांमध्ये प्रचंड भीती पसरली.




अपघात घडताच परिसरातील नागरिकांनी मदत कार्य सुरू करून पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. या भीषण अपघातात बसचा चालक, प्रवासी असे चार ते पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. सर्व जखमींना तातडीने उपचारासाठी जवळच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सुदैवाने इतर प्रवासी सुरक्षित असून त्यांना दुसऱ्या वाहनाने पुढे रवाना केले.भरधाव खासगी बसने दुकानांना चिरडल्याने अतोनात नुकसान झाले आहे. हा अपघात पहाटेच्या वेळी घडला. त्यावेळी ही दुकाने बंद होती. पहाटेच्या सुमारास घटनास्थळावर कोणीही उपस्थित नव्हते. परिणामी, या भीषण अपघातात सुदैवाने जीवितहानी टळली. जर हा अपघात दिवसा किंवा वर्दळीच्या वेळी झाला असता, तर मोठा अनर्थ घडला असता, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

### धोकादायक वाहतूक

महामार्गांवर रात्रीच्या सुमारास खासगी बसमधून प्रवाशांची अत्यंत धोकादायक पद्धतीने वाहतूक केली जाते. चालकांकडून भरधाव वेगाने खासगी बस चालवल्या जातात. त्यामुळे बस अनियंत्रित होऊन अपघातांच्या प्रमाणात चांगलीच वाढ झाली आहे. यावर परिवहन विभागाकडून नियमित तपासणी होऊन नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. मात्र, परिवहन विभागाचे याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसून येते. त्यामुळे सातत्याने अपघात घडून प्रवाशांचा जीव धोक्यात आला आहे.


# पेरणीची चिंता ; शेतीच्या आशेवर सौभाग्याचे लेण तारण


## ग्रामीण भागात बळीराजाची पेरणीसाठी धडपड

**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

मृगाने केलेल्या सावकाश आगमनामुळे व यंदाच्या खरीपावर असलेले एल निनोच्या सावटात सकारात्मकता बाळगून पेरणीपूर्व मशागतीची कामे आटोपून शेतकरी आता बि-बियाणे व खते खरेदीकडे वळला आहे. त्यासाठी करावयाच्या आर्थिक तजविजीसाठी गृहिणींच्या सौभाग्याचे लेणे पतसंस्थांत कैद होत असल्याचे चित्र ग्रामीण तसेच शहरी भागातील पतपुरवठादार संस्थांतील सोने तारण ठेवण्यासाठी होणार्‍या शेतकर्‍यांच्या गर्दीवरून दिसून येत आहे.

कर्जमाफीची घोषणा झाली असली तरी किचकट अटी व निकषांच्या फेर्‍यात शेतकर्यांत संभ्रमावस्था असल्याने खरिपासाठी पेरणीपूर्व पीककर्ज मिळेल की नाही, याबाबत अनिश्चितताच आहे. अमेरिका-इराण युद्ध परिस्थितीनंतर सर्वच वस्तूंचे भाव काही प्रमाणात वाढले असले तरी बियाणे व खतांच्या बाबतीत ही वाढ लक्षणीय आहे. मागील वर्षीचा न भेटलेला विमा व वाढलेल्या बियाण्यांच्या किमती पाहता यंदाच्या खरिपात पेरणीसाठी लागणारी आर्थिक तरतूद भागविण्यासाठी अनेक शेतकर्‍यांनी आपल्या घरचे दागिने बँकेत तारण ठेवण्यास सुरवात केली. परिसरातील पतसंस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावातच तब्बल ५० लाखांच्या वर सोने तारण कर्जाचे वाटप केले आहे. हे प्रमाण शहरी भागातील बँकांत कोटींच्या वर आहे. आधीच अडचणीत आलेल्या शेतकर्‍याला सोने तारण ठेवून खरिपाच्या पेरणीची तयारी करावी लागत असल्याने प्रशासनासह बँकांचा नियोजनशून्य कारभार चव्हाट्ट्यावर आला आहे. गतवर्षी परतीच्या पावसाने हाहाकार माजवला तरीदेखील शेतीच्या नुकसानाबाबत लोकप्रतिनिधींच्या नाकर्तेपणामुळे जिल्ह्याला पीक विमा नामंजूर करण्यात आला. हाती आलेला शेतमाल गरजेपोटी मिळेल, त्या दरात विकावा लागला. त्यात बँकांच्या पीककर्ज वाटपाबाबत अद्याप योग्य नियोजन नसल्याने शेतकर्‍यांच्या अडचणीत आणखीच भर पडली आहे. ऑनलाइन अर्ज व वेळखाऊ प्रक्रियेमुळे कर्ज कधी उपलब्ध होईल, या आशेवर न राहता अनेक शेतकर्‍यांनी अर्धांगिनीचे सौभाग्याचे लेणे तारण ठेवून पेरणीसाठी कर्ज काढण्यास सुरवात केली आहे. तर ज्या शेतकर्‍यांकडे तारण ठेवण्यासाठी सोने नाही त्यांनी खासगी सावकारांचे उंबरे झिजवायला सुरवात केली आहे. तालुक्यातील कर्ज देणार्‍या खासगी बँकांत, पतसंस्थांत सोने तारण ठेवण्यासाठी गर्दी दिसून येत आहे. शेतकर्‍याची आर्थिक स्थिती न सुधारण्यामागे शासनाचे फसवे शेतकी धोरण कारणीभूत आहे. शेतीपूरक व्यवसायालाही प्रोत्साहन मिळावयास हवे, असे शेतकरी नेते प्रकाश साबळे यांनी दैनिक विदर्भ प्रजासत्ताक सोबत बोलतांना सांगितले.






# अमरावती सह राज्यात पावसाचा जोर वाढणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २६ अमरावती**

उशिराने हजर झालेल्या पावसाने आता संपूर्ण राज्यात आपल्या सरी पाडल्या आहेत. वाढत्या उकाड्याने हैराण झालेले नागरिक पावसाच्या येण्याने थोड्या फार प्रमाणात का असेना परंतु सुखावले आहेत. मुंबईतही बुधवारी (२४ जून) पावसाने जोरदार हजेरी लावल्याचे पाहायला मिळाले. परंतु, एका दिवसाच्या हजेरीनंतर तो पुन्हा गायब झाला आहे. अशातच आता हवामान विभागाकडून राज्यात पावासाचा जोर वाढणार असल्याची शक्यता व्यक्त केली आहे. राज्यातील अनेक भागात भारतीय हवामान विभागाने पावसाचा अलर्ट जारी केला. १ जुलैपर्यंत राज्यात पावसाचा इशारा देण्यात आला. काही जिल्ह्यांमध्ये हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. मुंबई, ठाणे आणि आजूबाजूच्या जिल्ह्यांतही विकेंडच्या दिवशी म्हणजेच शनिवारी आणि रविवारी पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे.



ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात अति मुसळधार ते मुसळधार पाऊस राहणार आहे. हवामान विभागाने मुंबई, ठाणे, रायगड, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर, सांगली, जळगाव, नंदुरबार, धुळे, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, जालना, अमरावती, अकोला, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा, वाशिम या जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. बऱ्याच भागांमध्ये जुलैच्या पहिल्या आठवड्यात मुसळधार पावसाचा अंदाज आहे. मुंबईसह उपनगरात पुन्हा पावसानं विश्रांती घेतली आहे. हलक्या स्वरुपाचा पाऊस आणि ऊन आहे. मात्र ४८ तासांत पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता स्कायमेटचे हवामान तज्ज्ञ महेश पलावत यांनी व्यक्त केली आहे. विदर्भ-मराठवाड्यात आज मुसळधार पाऊस पडणार आहे. कोकणात मात्र काही अंशी पाऊस विश्रांती घेईल. विकेण्डला मात्र पुन्हा पावसाचा जोर वाढणार आहे.

# अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचा वज्रघात

## सत्तेच्या तुकड्यांवर पाळले जाणारे खा.संजय दिना पाटील म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणाला लागलेली कीड! - अनिल अग्रवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती-** प्रेस कॉन्सिल ऑफ इंडियासारख्या देशाच्या सर्वोच्च संस्थेचे सदस्यत्व भोगलेल्या खा.संजय दिना पाटील नावाच्या प्रवृत्तीने लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला जीवे मारण्याची लायकी नसलेली धमकी देणे, हा त्यांच्या नैतिक दिवाळखोरीचा आणि वैचारिक अध:पतनाचा सर्वात गलिच्छ नीचांक आहे, अशा शब्दांत अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. अनिल अग्रवाल यांनी पाटील यांच्यावर शेलक्या शब्दांत घणाघात केला आहे.खा.संजय दिना पाटील यांच्या लाचार वृत्तीचा समाचार घेताना अनिल अग्रवाल अत्यंत आक्रमकपणे म्हणाले, ज्यांनी केवळ आणि केवळ सत्तेच्या तुकड्यांसाठी, मलईदार पदांसाठी आणि वैयक्तिक स्वार्थापोटी आपली निष्ठा रात्रीतून गहाण ठेवली, ज्यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या पाठीत खंजीर खुपसून सत्तेच्या लाचारीसाठी एकनाथ शिंदे गटात उडी मारली, त्या संजय दिना पाटलांना 'पक्षनिष्ठा', 'प्रामाणिकपणा ' आणि 'नैतिकता' या शब्दांची साधी चाडही उरलेली नाही. स्वत:ची वैचारिक अस्मिता आणि स्वाभिमान बाजारात विकून सत्तेची उब घेणाऱ्या अशा लाचार आणि पळपुट्या राजकीय उपटसुंभांनी पत्रकारांना धमकावण्याची हिंमत करू नये.अनिल अग्रवाल यांनी पुढे ठणकावून सांगितले की, ज्या खा.संजय दिना पाटलांनी 'प्रेस कॉन्सिल'वर माझ्यासोबत काम करताना पत्रकार संरक्षणाचे ढोंग वेशीवर टांगले होते, आज सत्तेची खोकी आणि गुर्मी डोक्यात गेल्यामुळे ते पत्रकारांना संपवण्याच्या भाषेवर उतरले आहेत. हा महाराष्ट्राच्या सुसंस्कृत आणि पुरोगामी परंपरेला लागलेला काळा डाग आहे. सत्तेच्या नशेत माजलेल्या या प्रवृत्तीची राजकीय मस्ती कशी जिरवायची, हे महाराष्ट्रातील पत्रकार चांगल्या प्रकारे जाणतात. खा.संजय दिना पाटील यांनी तात्काळ आणि नाक घासून माफी मागावी; अन्यथा राज्यभरातील पत्रकार रस्त्यावर उतरून त्यांच्या या गुंडशाहीचा, सत्तेच्या लाचारीचा आणि नैतिक अध:पतनाचा बुरखा चव्हाट्यावर टराटरा फाडल्याशिवाय शांत बसणार नाहीत!असे अनिल अग्रवाल यांनी ठणकावून सांगितले.



# ई-सिगारेटच्या अवैध साठ्यावर गुन्हे शाखेची धाड; २.७५ लाखांचा मुद्देमाल जप्त


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती-** शहर गुन्हे शाखेने इलेक्ट्रॉनिक सिगारेटच्या अवैध साठ्यावर धाड टाकून २ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एका आरोपीला अटक केली आहे. ही कारवाई शुक्रवारी (२६ जून) केडिया नगर परिसरातील गजानन टॉवर अपार्टमेंटमध्ये करण्यात आली.पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या निर्देशानुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखालील पथकाला गुप्त माहिती मिळाली होती की, आशिष बाबुराव कडू (वय ४०) हा प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक सिगारेट विक्रीच्या उद्देशाने फ्लॅटमध्ये मोठा साठा करून ठेवत आहे. त्यानुसार पोलिसांनी फ्लॅटवर छापा टाकला असता स्टोअर रूममधून डएडऋइ-ठ ठ-ध- ड१ कंपनीच्या विविध फ्लेवरच्या ५५ रिचार्जेबल डिस्पोजेबल इलेक्ट्रॉनिक सिगारेट जप्त करण्यात आल्या.जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे २ लाख ७५ हजार रुपये असून आरोपीविरुद्ध राजापेठ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २७५ तसेच इलेक्ट्रॉनिक सिगारेट प्रतिबंध अधिनियम, २०१९ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर, दिनेश दहातोंडे व त्यांच्या पथकाने केली.



# अभ्यासिकेच्या भाडेकरारात अनियमिता; गृहपाल आणि गृहप्रमुख निलंबित, आयुक्त स्तरावर स्वतंत्र चौकशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

अमरावती येथील आदिवासी विकास विभागात सुरू असलेला अनागोंदी कारभार आणि कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार अखेर चव्हाट्यावर आला आहे. गाडगे नगर भागात आदिवासी विद्यार्थ्यांच्या अभ्यासिकेकरिता शासनाची स्वत:ची सुसज्ज इमारत बांधून तयार असतानाही, राजकमल चौक येथील एका खासगी मॉलमध्ये दरमहा तब्बल ८ लाख ६८३ रुपये अशा अवाजवी दराने अभ्यासिका व वसतिगृह भाड्याने घेण्याचा प्रताप अधिकाऱ्यांनी केला. या माध्यमातून अवघ्या १४ महिन्यांत शासनाच्या तिजोरीतून १ कोटी १२ लाख रुपयांचे भाडे अदा करून शासकीय निधीची उधळपट्टी करण्यात आली. या गंभीर घोटाळ्यावर आमदार सुलभा खोडके यांनी विधिमंडळ अधिवेशनात आक्रमक पवित्रा घेत लक्षवेधी सूचना मांडली. यावर उत्तर देताना आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी या प्रकरणात १०० टक्के अनियमितता झाल्याचे मान्य करत अपर आयुक्त कार्यालयांतर्गत गृहप्रमुख पटेल आणि गृहपाल बाजपेयी या दोघांना तात्काळ निलंबित करण्याची घोषणा सभागृहात केली.



आदिवासी विकास विभागातील या उघड भ्रष्टाचारावर आमदार सुलभा खोडके यांनी अधिवेशनात जोरदार ताशेरे ओढले. शासनाचे नुकसान करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांकडून हे भाडे वसूल करण्यात यावे आणि गृहपालावर निलंबनाची कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी लावून धरली. आ. खोडके यांच्या आक्रमक भूमिकेनंतर मंत्री डॉ. अशोक उईके यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. या प्रकरणात अपर आयुक्तांमार्फत ११ मे २०२६ रोजी एक चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने २९ मे २०२६ रोजी आपला अधिकृत अहवाल शासनाला सादर केला.

या अहवालात अभ्यासिकेच्या करारात १०० टक्के अनियमितता आणि गैरव्यवहार झाल्याचे स्पष्टपणे निदर्शनास आले आहे.

मंत्री डॉ. अशोक उईके यांनी सभागृहात सांगितले की, केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई करून हा विषय थांबणार नाही. आदिवासी अपर आयुक्त कार्यालयातील ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या संपूर्ण प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आणि या आर्थिक अनियमिततेला खतपाणी घातले, त्यांचीही चौकशी केली जाईल. पुढील चौकशीत जे अधिकारी दोषी आढळतील, त्यांच्यावरही कडक कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करण्याचे निर्देश आदिवासी विकास मंत्र्यांनी नाशिक येथील आदिवासी आयुक्तांना दिले आहेत.